आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -  रात्री ८.०५ वाजता

१५ मे २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पुन्हा सत्तेत आल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत विकासाचा पाया घालणार असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंतर्गत पहिल्यांदाच १४ जणांना नागरिकत्व प्रमाणपत्र प्रदान
- झारखंडचे ग्रामविकास मंत्री आलमगीर आलम यांना मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीकडून अटक

  आणि
- रशियाच्या दबावानंतर युक्रेनकडून काही भागातलं सैन्य मागे, युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांचे परदेश दौरे रद्द

**<><><><><>**

पुन्हा सत्तेत आल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांत आपण विकासाचा पाया घालणार आहोत. जेणेकरून २०४७ च्या विकसित भारताचं ध्येय जवळ येईल,असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कल्याणमध्ये केलं. पहिल्या १२५ दिवसांचा आराखडा तयार आहे. यासाठी तरुणांनी सूचना लिहून पाठवाव्यात. त्या सूचनांचा समावेश आपण आपल्या आराखड्यात करू, असं ते म्हणाले.

आपल्या सरकारच्या काळात २५ कोटी जनता गरीबी रेषेच्या वर आली आहे. देशात पहिल्यांदाच गरीबांकडे वैद्यकीय उपचारासाठी गॅरंटी कार्ड आलं आहे, पक्कं घर बांधलं जात आहे, प्रत्येक घरासाठी नळ योजना राबवली जात आहे, असंही ते म्हणाले.

सध्या घाटकोपरमध्ये परिसरात प्रधानमंत्री यांचा रोड शो सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महायुतीचे उमेदवार यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येनं यात सहभागी झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांनी हा रोड शो सुरू केला. पारंपरिक वस्त्र, ढोल-ताशे यांच्या गजरात मोठा जल्लोष यामध्ये सुरू आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं लोक कल्याणाच्या योजना राबवताना कुठल्याही धर्माला केंद्रस्थानी ठेवलं नव्हतं. पण काँग्रेस धर्माच्या आधारे आरक्षण देण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा भाजपा नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नाशिक जिल्ह्यातल्या प्रचारसभेत केला. अर्थसंकल्पातली १५ टक्के तरतूद अल्पसंख्यांकांसाठी ठेवण्याचा काँग्रेसचा विचार होता. पण मुख्यमंत्री असताना याला विरोध केल्यानं काँग्रेसला ते करता आलं नाही, असा दावा त्यांनी यावेळी बोलताना केला.

शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावरही त्यांनी टीका केली. राम मंदिराच्या मुद्द्यावर काँग्रेस करत असलेल्या वक्तव्यांवर उद्धव ठाकरे काहीही मत व्यक्त करत नसल्याचा दावा त्यांनी केला. बाळासाहेबांची स्वप्न उद्धव ठाकरे यांनी नष्ट केल्याचा आरोप प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी बोलताना केला.

**होल्ड प्रधानमंत्री १**

या निवडणुकीच्या चारही टप्प्यात इंडिया आघाडीला लोकांनी नाकारलं असल्याचं ते म्हणाले. केंद्रातलं सरकार शेतकरी विरोधी असल्याचा विरोधकांचा दावा खोडून काढत त्यांनी शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या विविध योजनांची माहिती दिली. कांद्याची निर्यात बंदी हटवल्यानंतर मोठ्या प्रमाणात निर्यात सुरू झाली असून दहा

दिवसातच 22 हजार क्विंटल कांद्याचे निर्यात झाल्यांचं त्यांनी सांगितलं. द्राक्षांना लवकरच क्लस्टर योजनेचा लाभ देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

आपल्यासाठी शेतकऱ्यांचं हित सर्वोतोपरी आहे. आपलं सरकार  पीएम किसान निधी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दरवर्षी बारा हजार रुपये देतं. दहा वर्षांत काद्यांची निर्यात ३५ टक्क्यांनी वाढवली. तसंच कांद्याच्या आयात-निर्यातीवर अनुदानदेखील दिलं असंही मोदी यांनी सांगितलं.

कांद्यासंदर्भात शेतकरीच स्वयंपूर्ण होईल आणि सरकारच्या मदतीशिवाय उभा राहू शकेल यासाठी केंद्र सरकार स्वतंत्र यंत्रणा उभारत असल्याचं उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस या सभेत म्हणाले. धान उत्पादक शेतकऱ्यांप्रमाणेच कांद्यालाही किमान आधारभूत मूल्य आणि प्रोत्साहनपर रक्कम देण्याची मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

भाजपाला पराभव समोर दिसत असल्यानं ते वारंवार काँग्रेस, शरद पवार आणि उद्धव ठाकरेंचा उल्लेख करतात असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आजच्या सभेत राम मंदिर आणि अल्पसंख्याक द्वेषावर भर देऊन लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप त्यांनी केला. काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर ते सातत्यानं बिनबुडाचे आरोप करत आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावरही मोदी यांनी काँग्रेसवर केलेले आरोप धादांत खोटे आहेत, असं ते म्हणाले. जाहिरातफलकाची दुर्घटना २ दिवसापूर्वीच झालेली असताना घाटकोपर परिसरातून रोड शो करुन भाजपा असंवेदनशीलता दाखवत असल्याचा दावा त्यांनी केला.

**<><><><><>**

काँग्रेस आणि इंडिया आघाडी कडून आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्याची तक्रार घेऊन भारतीय जनता पार्टीचे नेते आणि केन्द्रीय मंत्रांचं शिष्टमंडळ आज निवडणूक आयोगाला भेटलं. यात केंद्रीय मंत्री एस.जयशंकर,जी.किशन रेड्डी,अर्जुन राम मेघवाल आणि राजीव चंद्रशेखर यांचा समावेश होता. आदर्श आचारसंहिता भंगाची २२ उदाहरणं आयोगासमोर ठेवली असून त्यावर त्वरित कारवाईची मागणी केल्याचं डॉ. जयशंकर यांनी या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतीय सैन्य दलाचा अपमान केल्याचंही आयोगाच्या निदर्शनाला आणल्याचं डॉ जयशंकर म्हणाले.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशात मतदानानंतर झालेल्या हिंसाचारासंदर्भात निवडणूक आयोगाने राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांना नोटीस बजावली आहे. हा हिंसाचार रोखण्यास असमर्थ ठरल्याचा ठपका ठेवत भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी काय पावलं उचलली आहेत याबद्दल माहिती देण्यासाठी त्यांना दिल्लीला पाचारण करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

CAA अर्थात नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंतर्गत आज पहिल्यांदा १४ जणांना नागरिकत्व प्रमाणपत्रांचं वाटप झालं. या कायद्याच्या अंतर्गत अर्ज केलेल्या या व्यक्तींना केंद्रीय गृहसचिव अजयकुमार भल्ला यांनी ही प्रमाणपत्र सुपूर्द केली. नागरिकत्वासाठी अर्ज केलेल्या इतरांना त्यांची प्रमाणपत्र ईमेलद्वारा पाठवण्यात आल्याचं केंद्रीय गृहमंत्रालयानं म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी हा ऐतिहासिक दिवस असल्याचं समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

या अधिसूचनेनुसार ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी पाकिस्तान,बांगलादेश किंवा अफगाणिस्तानातून भारतात आलेल्या हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारसी आणि ख्रिश्चन धर्माच्या माणसांनी नागरिकत्वासाठी अर्ज करायचे होते.

**<><><><><>**

झारखंडचे ग्रामीण विकास मंत्री आणि काँग्रेस नेते आलमगीर आलम यांना मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयानं आज अटक केली. आलम यांची कालपासून चौकशी सुरू होती. आज सलग सहा तास चौकशी झाल्यानंतर आलम यांना मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्या अंतर्गत अटक झाली. झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन आधीच ईडीच्या अटकेत आहेत.

**<><><><><>**

न्यूज क्लिक चे संस्थापक प्रबीर पूरकायस्थ यांची सुटका करण्याचे आदेश आज सर्वोच्च न्यायालयाने दिले. न्यायमूर्ती बी आर गवई आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठाने हा निर्णय दिला. या प्रकरणी रिमांडची प्रत देण्यात आली नव्हती त्यामुळे त्यांची अटक चुकीची ठरते असं न्यायालयानं सांगितलं. गेल्या वर्षी ३ ऑक्टोबरला दहशतवाद विरोधी कायद्यान्वये त्यांना अटक करण्यात आलं होतं. चिनी मतप्रवाहाचा प्रचार करण्यासाठी न्यूझ क्लिक ला पैसे मिळत होते, असा आरोप आहे.

**<><><><><>**

कथित अबकारी कर घोटाळ्यातले आरोपी,दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत दिल्लीच्या न्यायालयाने चालू महिन्याच्या ३० तारखेपर्यंत वाढ केली आहे.

<><><><><>

कान्स चित्रपट महोत्सवातल्या भारत पर्वचं उद्घाटन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू आणि फ्रांस तसंच मोनॅको मधले भारतीय राजदूत जावेद अश्रफ यांनी संयुक्तरित्या केलं. भारतीय फिल्म उद्योगातर्फे यात विविध उपक्रम राबवण्यात येणार असून त्यात माहितीचे आदानप्रदान, संयुक्त फिल्म निर्मिती, फिल्म उद्योगातल्या नामवंतांच्या भेटीगाठी यांचा समावेश आहे. अहमदाबादच्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ डिझाईन या संस्थेनं ‘सूत्रधार’ या संकल्पनेवर आधारित या पॅव्हिलियनची रचना केली आहे.

<><><><><>

रशियाच्या सैन्याकडून सातत्यानं टाकलेल्या दबावानंतर युक्रेननं खार्किवच्या सीमाभागात असलेल्या गावांमधून आपलं सैन्य मागं घेतलं आहे. युद्धामुळे होणारं नुकसान टाळण्याच्या उद्देशानं लुक्यांसी आणि वोवचान्स्क या भागांतून सैन्य मागं घेण्याचा निर्णय घेतल्याचं युक्रेनच्या लष्करी प्रवक्त्यानं सांगितलं. तर रशियन सैन्यानं दक्षिणेकडच्या झापोरिझ्झिया भागातील काही भागांवर नियंत्रण मिळवल्याचा दावा रशियानं केला आहे.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी त्यांचे सर्व परदेश दौरे रद्द केले आहेत.

<><><><><>

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा राजस्थान रॉयल्सनं ७ षटकात २ बाद ४१ धावा झाल्या होत्या. पंजाब किंग्ज विरोधात

गुवाहाटीमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><>//